



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २८ वे | अंक ३३० | पाने ४ | गुरुवार | दि. ३ एप्रिल २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# वक्फ बोर्डात गैर मुस्लिमांना प्रवेश नाही

***नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-***

वक्फ बोर्डवरून विरोधक लोकांमध्ये गैरसमज परसवत असून त्यांच्या मतपेढीसाठी अल्पसंख्यांक समाजाला भीती दाखवत असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला. नव्या वक्फ बोर्ड कायद्यानुसार, कोणताही गैर मुस्लिम व्यक्ती याचा सदस्य नसेल. देणगीसाठी देण्यात आलेल्या निधीचा वापर योग्य पद्धतीने होतोय का नाही हे पाहणे वक्फ बोर्डचे काम असेल. त्यामध्ये इस्लामी धर्माच्या श्रद्धेमध्ये कोणताही हस्तक्षेप करण्याची सरकारची इच्छा नसल्याचं अमित शाहांनी स्पष्ट केलं.



अमित शाह म्हणाले की, 'वक्फ' हा अरबी शब्द आहे, ज्याचा इतिहास काही हदीसशी जोडलेला आहे. आजकाल त्याचा अर्थ धर्मादाय देणगी असा घेतला जातो. वक्फ म्हणजे 'अल्लाहच्या नावाने पवित्र संपत्तीचे दान'. हा शब्द प्रथम खलीफा उमरच्या काळात वापरला गेला होता आणि आज समजला तर तो परत घेण्याच्या हेतूशिवाय एखाद्या व्यक्तीने धार्मिक किंवा सामाजिक कल्याणासाठी दिलेल्या मालमत्तेचे दान आहे. या प्रक्रियेला 'वक्फ' म्हणतात.

देणगी खूप महत्त्वाची आहे, मात्र ज्या गोष्टी आपल्या स्वत:च्या आहेत त्यातूनच दान करता येते, असे शाह म्हणाले. कोणीही सरकारी मालमत्ता दान करू शकत नाही किंवा इतर कोणाचीही मालमत्ता दान करू शकत नाही.

अमित शाह म्हणाले की, देशात दिल्ली सल्तनत काळात वक्फ अस्तित्वात आला आणि ब्रिटीशांच्या काळात तो धार्मिक बंदोबस्त कायद्यानुसार चालवला जात होता. नंतर १८९० मध्ये, धर्मादाय मालमत्ता कायद्यांतर्गत ही प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर १९१३ मध्ये मुस्लिम वक्फ वैधता कायदा अस्तित्वात आला. १९९५ मध्ये वक्फ न्यायाधिकरण आणि वक्फ बोर्डांची स्थापना करण्यात आली. वक्फ परिषद आणि वक्फ बोर्ड १९९५ पासून अस्तित्वात आला.

अमित शाह म्हणाले की, हा संपूर्ण वाद वक्फमध्ये गैर मुस्लिमांच्या प्रवेशाबाबत आहे. वक्फमध्ये कोणीही गैर-इस्लामी सदस्य असू शकत नाही अशी तरतूद पूर्वी होती. यावरून हे स्पष्ट होते की कोणतीही गोष्ट गैर-इस्लामिक असू शकत नाही आणि धार्मिक संस्था चालवताना गैर-मुस्लिम सभासदांना ठेवण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. अशी कोणतीही तरतूद करण्याची आमची इच्छा नाही.

मुस्लिमांच्या मालमत्तेला किंवा समानतेच्या अधिकारांना हानी पोहोचेल या विरोधी पक्षांच्या आरोपांना उत्तर देताना गृहमंत्री म्हणाले की, वक्फ बोर्ड आणि कौन्सिलची स्थापना १९९५ पासून करण्यात आली होती आणि ही प्रक्रिया केवळ मालमत्तेचे प्रशासन आणि नियमन आणि कोणत्याही धर्माच्या श्रद्धांमध्ये हस्तक्षेप न करण्याशी संबंधित आहे. हा गैरसमज पसरवून त्यांची व्होट बँक तयार व्हावी यासाठी अल्पसंख्याकांना घाबरवले जात आहे.

हिमाचलमध्ये वक्फ जमीन घोषित करून मशीद बांधल्या गेल्याचा दावा शाहांनी केला. तसेच, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची अनेक उदाहरणे दिली, ज्यात वक्फने वक्फने मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली. शाहा पुढे म्हणाले, येथे एका सदस्याने म्हटले की, अल्पसंख्याक समुदाय हा कायदा स्वीकारणार नाही. हा संसदेचा कायदा आहे आणि सर्वांना तो स्वीकारावाच लागेल. कोणत्याही सदस्य अल्पसंख्याक समुदाय हा कायदा मान्य करणार नाही, असे कसे म्हणू शकतो? हा कायदा भारत सरकारचा कायदा आहे आणि तो स्वीकारावा लागेल, असेही शाहांनी ठणकावून सांगितले.

# निवासराव थोरात यांचा उमेदवारी अर्ज अवैध

## प्रादेशिक सहसंचालकांच्या निर्णयाला उच्च न्यायालयाची स्थगिती

***कराड/प्रतिनिधी:-***



उच्च न्यायालयाने प्रादेशिक सहसंचालकांच्या निर्णयाला स्थगिती दिल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवासराव थोरात यांच्या उमेदवारीवर दिलेला अवैधतेचा निकाल कायम राहिला आहे. त्यामुळे निवासराव थोरात सह्याद्रि सहकारी साखर कारखाना निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडले आहेत. श्री. थोरात पॅनेल प्रमुख असल्याने हा निर्णय स्व. यशवंतराव चव्हाण सह्याद्रि स्वाभिमानी सभासद परिवर्तन पॅनेलला मोठा धक्का मानला जात आहे.

दरम्यान, या निकालामुळे सह्याद्रि कारखान्याच्या सभासदांमध्ये चर्चेला उदान आले असून निवडणुकीत मतदानावर याचा नेमका काय परिणाम होणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

सह्याद्रि कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवासराव थोरात यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी संजयकुमार सुद्रिक यांच्या समोर झालेल्या सुनावणीत अवैध ठरला होता. या विरोधात थोरात यांनी प्रादेशिक सहसंचालक नीलिमा गायकवाड यांच्याकडे अपिल दाखल केले होते. गायकवाड यांनी निवासराव थोरात यांच्यासह नऊ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविले होते. प्रादेशिक सहसंचालकांच्या निकालाला आव्हान देत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मुरलीधर गायकवाड यांनी निवासराव थोरात यांच्या उमेदवारी अर्जावर मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते. दोन्ही बाजूकडून युक्तीवाद करण्यात आले. बुधवारी न्यायालयाने प्रादेशिक सहसंचालक यांच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निवासराव थोरात यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवणारा निर्णय कायम राहिला आहे.

त्यामुळे थोरात सह्याद्रि सहकारी साखर कारखाना निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडले आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत असून मतपत्रिकेवर त्यांचे नाव राहणार नाही. दरम्यान, एकंदरीत या नाट्यमय घडामोडींमुळे कारखान्याचे सुज्ञ सभासद मतदानातून नेमका काय निर्णय देणार याकडे सर्व सभासद, शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# अर्ज वैध किंवा अवैध ठरला, तरीही मागे हटणार नाही

## निवासराव थोरात ;निवडणूक जोमाने लढवणार आणि जिंकणारही

***कराड/प्रतिनिधी:-***

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून काहींनी जाणीवपूर्वक माझा अर्ज बाद करण्यासाठी प्रयत्न केले. यामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अर्ज बाद केल्यानंतर सहकार आयुक्तांकडे याबाबत दाद मागितली. यात त्यांनी अर्ज वैद्य ठरवला. परंतु, त्यानंतरही त्यावर हरकत घेतल्याने याबाबत न्यायालयाकडे दाद मागितली होती. मात्र, त्यांनी अनेकवेळा याबाबाचा निकाल राखून ठेवला. या प्रक्रियेत माझा उमेदवारी अर्ज वैद्य किंवा अवैध ठरला, तरीही आपण ही निवडणूक जोमाने लढवणार असून विजय खेचून आणणार असल्याचा विश्वास स्व यशवंतराव चव्हाण सह्याद्रि स्वाभिमानी सभासद परिवर्तन पॅनलचे प्रमुख निवासराव थोरात यांनी व्यक्त केला.

या न्यायालयीन लढ्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, किसान मोर्चाचे सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

थोरात म्हणाले, न्यायालयाने निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय मान्य केला असून साखर सह आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती दिल्यादिली असल्याचे समजले आहे. परंतु, याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र, माझ्या उमेदवारी अर्जाबाबत न्यायालयाचा निकाल काहीही येवोत, परंतु, आता मागे हटणार नाही. धैर्यशील कदम आणि रामकृष्ण वेताळ यांच्या साथीने ही निवडणूक जोमाने लढवणार असून यामध्ये विजयश्री खेचून आणणार आहे. येत्या दोन-तीन दिवसात कारखाना कार्यक्षेत्रात जोमाने प्रचार करून मतदारांसमोर सर्व हकीकत मांडणार आहे. कारखान्याच्या सभासद, शेतकरी सुज्ञ आहेत. त्यामुळे ते कोणत्याही दबावाला बळी न पडता नाहीत. ते प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना न्याय देतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत सातारा जिल्हा राज्यात प्रथम

***सातारा/प्रतिनिधी:-***

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना उद्देश हा राज्य शासनाची नवीन उद्योग निर्मिती व मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे आहे. शासनामार्फत मिळणारे अनुदान उद्योग संचालनालयामार्फत बँकांमार्फत बँक खात्यात जमा करण्यात येते. ही योजना नवीन उपक्रम सुरु करण्यासाठी बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जास संलग्न अनुदान आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्याला ६७३ उद्योगांना कर्जास संलग्न अनुदान देण्याचे उद्दिष्ट होते. या तुलनेत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ९८५ उद्योगांना या योजनेचा लाभ देऊन १३६ टक्के उद्दिष्ट पुर्तीकरत सातारा जिल्ह्याने राज्या प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिली.

# 'सह्याद्रि'च्या सभासदांचा पी.डी. पाटील पॅनलवर विश्वास

***कराड/प्रतिनिधी:-***

गेली अनेक वर्षे सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याने गळीतास आलेल्या ऊसास उच्चतम दर देऊन, शेतकऱ्यांना ऊस बिले वेळेत अदा केली आहेत. कारखान्याच्या काट्यामध्ये अचूकता आहे. त्यामुळे सह्याद्रि'च्या सभासदांचा पी.डी. पाटील पॅनलवर विश्वास आहे, असे मत कारखान्याच चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

सैदापूर (ता. कराड) येथील सभासदांच्या संवाद बैठकीप्रसंगी ते बोलत होते. बैठकीस राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस अजितराव पाटील-चिखलीकर, जयंतकाका पाटील, शंकरराव खापे, ड. संजय जगदाळे, रामदास पवार, बाळासाहेब सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

चेअरमन बाळासाहेब पाटील म्हणाले, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाल्यापासून जिल्ह्यातील अनेक नेते मंडळींकडून आपल्या पी. डी. पाटील पॅनलला पाठिंबा मिळत आहे. यावरून कारखान्यावर असणारी विश्वासार्हता सिद्ध होते. कारखान्याने नेहमीच उच्च दराची परंपरा कायम ठेवली आहे. त्याचबरोबर वेळेत बिले अदा करण्यामुळे आपल्या पी. डी. पाटील पॅनलवर सभासदांचा विश्वास आहे.

अजितराव पाटील म्हणाले, गेली ५० वर्षे सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून परिसरातील उसाचे गाळप होत आहे. कारखाना कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बागायत झाल्याने ऊस क्षेत्र वाढले आहे. तसेच उसाचे हेक्टरी उत्पन्न देखील वाढले आहे. त्यामुळे ऊस तोडणीस विलंब होत होता. कारखान्याने विस्तार करण्याचा निर्णय घेतला. विस्तार वाढीचे काम पूर्ण झाले असून पुढील हंगामापासून जवळपास १३ हजार होणार असून ऊस तोडीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.



याप्रसंगी राजेंद्र पाटील, ताजुद्दीन मुल्ला, दीपक लादे, प्रशांत यादव, उदय थोरात, नेताजी चव्हाण, विखे नलवडे, नागेश मिसाळ, धनाजी श्रीपती जाधव, आनंदराव देसाई, संभाजी भार्गव जाधव, अशोक श्रीरंग जाधव, श्रीरंग जाधव, पांडुरंग जाधव, तानाजीराव माळी, नानासो जाधव, सचिन पाटील, शरद जाधव, मानसिंग जाधव, उपसरपंच अनिल जाधव, विकास जाधव, हिंदुराव जाधव, नितीन कणसे, दिलीप जाधव, बाळासाहेब जाधव, संजय जाधव, उत्तम कणसे, सलीम मुल्ला, अशोक माळी, रमेश जाधव, मानसिंग जाधव, दिलीप जाधव, अशोक जाधव, सुनील जाधव,पांडुरंग जाधव, नारायण कोकरे, धनाजीराव जाधव, विलास जाधव, अधिकराव काशीद, प्रमोद जाधव, कुमार जाधव, तसेच सभासद व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# बदलाच्या दृष्टीने 'सह्याद्रि'च्या सभासदांची वाटचाल

## आ.मनोज घोरपडे ;विद्यमान चेअरमनांनी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याचा आरोप

***कराड/प्रतिनिधी:-***

'सह्याद्रि'चे वारे आता बदलाच्या दिशेने वाहू लागले आहे. ही निवडणूक सभासदांनीच हातात घेतली असून विद्यमान चेअरमनांनी माफी नामे लिहून घेतल्याचे सभासद विसरले नाहीत. जाणीवपूर्वक वारस नोंदी टाळल्या. कामगारांचा खासगी कामांसाठी गैरवापर केला. गेल्या ३०-४० वर्षांत सह्याद्रि कारखान्यात ७०-८० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आमदार मनोजदादा घोरपडे यांनी केला.

तळबीड (ता. कराड) येथे स्व. यशवंतराव चव्हाण परिवर्तन पॅनेलच्या प्रचारार्थ ते बोलत होते. यावेळी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन अनिल मोहिते, कारखान्याचे माजी संचालक रमेश मोहिते, गामपंचायत सदस्य राजेंद्र मोहिते, माजी उपसरपंच दादासाहेब मोहिते, ॲड. शशिकांत मोहिते, सुनिल मोहिते, माणिक पाडळे, सुभाष गायकवाड, विकास यादव, बाबा माने, विलास गायकवाड, संजय चव्हाण, सयाजीराव मोहिते, सुजय मोहिते, शालिनीताई गुणवंत, महादेव गायकवाड, सुधाकर तुपे, प्रकाश मोहिते, रमेश मोहिते, सिद्धार्थ भोसले, संजय घोरपडे, संपतराव जाधव, अशोकराव चव्हाण, भास्कर पवार, महेशबाबा जाधव, तसेच सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. घोरपडे म्हणाले, इरिगेशन संस्थाच्या माध्यमातून निर्माण केलेल्या दबावात आता कुणीही राहण्याची गरज नाही. उलट इरिगेशन संस्थाना आपण अधिक उर्जितावस्था मिळवून देवू, असा विश्वास व्यक्त करत कराड उत्तरचा पाणीप्रश्न सोडवणे हा माझ्या कामाचा प्रमुख अजेंडा असल्याचे त्यांनी सांगितले.



तळबीड:सभासद बैठकीत बोलताना आ.मनोज घोरपडे,समवेत इतर मान्यवर.

ते म्हणाले, आज मी अपघाताने आमदार झाल्याची टीका केली जाते. परंतु, कराड उत्तरमधील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी साडेतीन महिन्यात काम केले. तुम्ही पंचवीस वर्षांत काय केले? एकतरी नाव सांगा. पान ३ वर

# सह्याद्रीच्या तिरंगी लढतीत कोण ठरणार बाहुबली..?

## बाळासाहेबांचेच वर्चस्व.! घोरपडे यांचे परिवर्तन की थोरात यांचा चमत्कार..!

***कराड/बाळकृष्ण गुरव:-***

राज्यातील सहकार क्षेत्रात दबदबा असणाऱ्या आणि सह्याद्री पॅटर्न म्हणून सर्वत्र लौकिक असलेल्या कराड तालुक्यातील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणुकीत तिरंगी पॅनलच्या शिलेदारांची शेवटच्या टप्प्यात मतांसाठी चांगलीच रस्सीखेच पहायला मिळत आहे या तिरंगी लढतीत मत विभागणीचा फायदा नक्की कोणाला होणार आणि कोण ठरणार बाहुबली? याची उत्सुकता लागून राहिली आहे गेली तीस वर्षे एक हाती सत्ता आबादीत ठेवणाऱ्या माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांचेच वर्चस्व राहणार..! विधानसभे प्रमाणेच सह्याद्रीतील परिवर्तन घडवणार म्हणून दंड थोपटलेल्या आ मनोज घोरपडे बाजी मारणार..! की काँग्रेस चे निवासराव थोरात व भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम आणि रामकृष्ण वेताळ यांचे पॅनल चमत्कार घडविणार...! याबाबत चर्चेला आता उधाण आले आहे...!



सुरुवातीला दुरंगी लढतीची शक्यता वाटत असतानाच विरोधकात फूट पडून तिसरे पॅनेल तयार झाल्याने गेल्या पंचवीस वर्षात बिनविरोधाची परंपरा ठेवण्यात यशस्वी झालेल्या सह्याद्रीची २०२५ ची निवडणूक तिरंगी लढतीत रूपांतरित झाली ही या निवडणुकीची वैशिष्ट्य आहे सह्याद्रीचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांचे पी डी पाटील पॅनल तर भाजपचे मनोज घोरपडे आणि ॲड उदयसिंह पाटील उंडाळकर यांचे स्व यशवंतराव चव्हाण साहेब सह्याद्री परिवर्तन पॅनेल तर काँग्रेसचे तालुका अध्यक्ष निवास थोरात भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम भाजपचे सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांचे स्व यशवंतराव चव्हाण सह्याद्री शेतकरी परिवर्तन पॅनेल अशा तीन राजकीय दिग्गजांचे तीन पॅनल स्वतंत्र उभी आहेत.

**पंचवीस वर्षानंतर होत आहे सह्याद्री निवडणूक...!**

गेली २५ वर्ष कराड उत्तर मतदारसंघात अधिराज्य गाजवणाऱ्या माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांचा भाजपचे मनोज घोरपडे यांनी काँग्रेसच्या साथीने विधानसभेत पराभवाचा दे धक्का दिला या पार्श्वभूमीवर सह्याद्रीच्या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे मात्र माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण ॲड उदयसिंह पाटील यांनी सह्याद्रीच्या निवडणुकीशी आपला संबंध नसल्याचे स्पष्ट केले असले तरी काँग्रेसचे प्रमुख शिलेदार मात्र निवडणूक रिंगणात उभे ठाकले आहेत तर मनोज घोरपडे यांना आमदार करण्यात धैर्यशील कदम रामकृष्ण वेताळ यांची मोलाची साथ केली असताना त्यांना मिळालेली दुय्यम वागणूक काँग्रेस भाजपमध्ये फाटाफूट झाली आणि आ मनोज घोरपडे यांनी रयत काँग्रेसच्या शिलेदारांना बरोबर घेत निवडणुकीत पॅनल टाकीत आव्हान उभे केले प्रारंभी कराड मार्केट कमिटी च्या निवडणुकीतील एकसंघतेची एकजूट करून सह्याद्री कारखान्यातही तोच पॅटर्न राबवण्याची शक्यता जास्त होती मात्र या निवडणुकीत दिग्गज नेत्यांनी माघार घेतल्याने प्रमुख कार्यकर्त्यांनी सूत्रे हातात घेऊन सह्याद्री च्या सत्ताधाऱ्यां पुढे चांगलेच आव्हान उभे केल्याचे दिसून येते त्यातच काँग्रेसच्या एका गटाने बाळासाहेब पाटील यांच्या पॅनलला पाठिंबा



दर्शवला मात्र विरोधकांच्या झालेल्या फटाफुटीमुळे मत विभागणीचा फायदा कोणाच्या पथ्यावर पडणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

**आरोप प्रत्यारोपाच्या फैरी...!**

सह्याद्रीच्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात चांगलेच विरोधी रान उठवले असले तरी वास्तविक पाहता विधानसभा आणि सहकारी कारखाना निवडणूक ही वेगळी आहे तेव्हा मूळचा सभासद कोणाकडे झुकतो त्यावर सर्व गणिते अवलंबून आहेत तरीही राजकीय दृष्ट्या मात्र माजी आ बाळासाहेब पाटील यांना मोठा विरोध दिसून येतो असे असले तरी त्यांच्या हक्काचे सभासद हा चेअरमन पाटील यांच्या समवेत असल्याचे दिसून येते मात्र विरोधकांनी सुद्धा सह्याद्री कर्जबाजारी केला वारस नोंदी केल्या नाहीत घरातच सत्ता ठेवल्या विस्तारीकरण जाणीवपूर्वक लांबवले निकृष्ट कामामुळे भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सह्याद्री राजकीय अड्डा केला सभासद मालक आहेत म्हणता मग माफीनामा का घेता कर्मचाऱ्यांची कुचंबना कामगारांच्यात नाराजी ऊस वेळेत न नेणे कामगार सभासद शेतकऱ्यांची पिळवणूक असे विविध कच्चे दुवे फोकस करण्यावर चांगलाच भर दिला आहे तर सत्ताधारी सुद्धा उच्चांकी दरांची परंपरा कायम पारदर्शक नियोजनबद्ध कारभार सभासदांसाठींच्या विविध योजनांचा लाभ सर्वांना समान वागणूक मोफत घरपोच साखर अचूक वजन काटे व ऊस नोंदी सभासदांना वेळेत बँक खात्यावर पैसे विश्वासार्थ यशवंत विचारांचा वारसा खाजगी कारखान्यांचा धोका सभासदांचा जीवनात आर्थिक परिवर्तन घडवले सह्याद्री कार्यक्षेत्र बागायत केले या महत्वपूर्ण बाबीवर भर दिला आहे.

**राजकीय दृष्ट्या विरोध वाढला...,!**


कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात ठोस विरोधक नसल्याने बाळासाहेब पाटलांचा विजय होत गेला याशिवाय गेली पाच पंचवार्षिक सह्याद्रीची निवडणूक बिनविरोध होत गेली मात्र या विधानसभेत सर्व विरोधक एकवटले युती धर्माकडे दुर्लक्ष केल्याने बाळासाहेब यांना पराभव पत्करावा लागला सर्व विरोधक एकवटल्यावर हीच परिस्थिती सह्याद्री कारखान्यात होईल अशी विरोधकांच्यात मानसिकता तयार झाली त्या अनुषंगाने सह्याद्रीत राजकीय दृष्ट्या विरोधांचा जोर वाढला कराड मार्केट कमिटीत बाळासाहेब पाटलांनी ॲड उदयसिंह पाटील उंडाळकर यांना केलेला विरोध भाजपचे अतुल भोसले यांच्याशी केलेली अभद्र युती उदयसिंह पाटील उंडाळकर यांना जिल्हा बँकेत केलेला विरोध दक्षिणेत अतुल भोसलेंना विधानसभेत केलेली साथ उत्तरेत पृथ्वीराज बाबांच्या काँग्रेसकडे केलेले दुर्लक्ष लोकसभेत मतांची झालेली उत्तरेतील पीछेहाट सर्वांना गृहीत धरणे व गाव पुढाऱ्यांचे दुर्लक्ष ओव्हर कॉन्फिडन्स ठराविक माध्यमांना च हाताशी धरणे आणि बाळासाहेब पाटील यांची चुकत गेलेली गणिते या सर्वांचा परिणाम त्यांच्या राजकीय कारकीर्दीवर झाला ही वस्तुस्थिती असली तरी बाळासाहेबांची सह्याद्री वरील असलेली भक्कम पकड आबादीत ठेवण्याचे त्यांच्यापुढे चांगलेच आव्हान ठरले आहे सध्या तिरंगी लढतीत बाळासाहेबां चे पारडे जड वाटत असले तरी प्रत्येक गोष्टीचे दुर्लक्ष आणि गाफीलपणा हा सशाच्या शर्यतीत कासव जिंकल्या चा इतिहास होईल.

**सह्याद्रीचा सुवर्ण महोत्सवी टप्पा पार..!**

सह्याद्रीने पन्नास वर्षाचा टप्पा नुकताच पार केला आहे एखाद्या सहकारी संस्थेने ५० वर्ष सभासदांचे मागे ठाम राहणे हे फार मोठे दिव्य आहे राज्याच्या सहकार क्षेत्रात सह्याद्री पॅटर्नचा बोलबाला आहे वास्तविक पाहता जिल्ह्यातील सहकारी साखर संस्थांमध्ये राजकीय दृष्ट्या कोणी लक्ष न घालण्याचा प्रघात असला तरी सह्याद्रीच्या निवडणुकीत राजकीय विरोध जास्त वाटत आहे प्रत्यक्ष मतदाना दिवशीच कोण बाजी मारणार आणि पुन्हा एकदा कोण बाहुबली होणार हे दस्तूरखुद्द सभासदच ठरवतील....!

**२३४ गावात ३२ हजार २०५ सभासद..!**

सातारा कराड कडेगाव कोरेगाव खटाव या पाच तालुक्यातील २३४ गावात सह्याद्री कारखान्याचे कार्यक्षेत्र असून सुमारे ३२ हजार २०५ सभासद मतदार पात्र आहेत या मध्ये



उंब्रज गटात ६,१६५ तळबीड गटात पाच हजार ५५३ मसूर गटात ५ हजार २४७ कराड गटात पाच हजार ११९ कोपर्डे हवेली गटात ५,०६९ वाठार किरोली गटात ५ हजार ६२ असे ३२ हजार २०५ एकूण मतदार संख्या आहे.

**ही निवडणूक विचारावर की पैशावर जाणार..?**

सुरुवातीला सहज सोपी वाटणारी सह्याद्रीची निवडणूक आता निर्णायक वळणावर येऊन ठेपली आहे फटाफटीमुळे ही निवडणूक प्रत्येकाने प्रतिष्ठेची केली आहे एकमेकाची आणि दोन्ही काढण्यात कसलीही कसर कोणी सोडली नाही काही व्यक्ती खालच्या टोकाला गेली उद्या सभांची आरोप प्रत्यारोपांच्या फेरी थंडावतील प्रत्यक्ष गाठीभेटीवर भर देण्यात येत असून प्रत्येक जण आपले चिन्ह मतदारापर्यंत पोहोचवत आहे एकेका मतासाठी चढाओढ दिसून येत आहे विविध अमिषेक दाखवण्याची रस्सीखेच सुरू आहे ठिकठिकाणी काय द्याची भाषा बोलू लागले आहेत सध्या या मतदारसंघात निवडणुकीचा कटरिया बदलत चालला असून मतांच्या दराच्या आकड्याची चर्चा सुरू आहे त्यामुळे सहकाराची ही निवडणूक पैशावर की विचारावर जाणार हा खरा प्रश्न आहे.

# संपादकीय

## वक्फ सुधारणावरुन वाद

लोकसभेत काल दि. २ एप्रिल रोजी संसदीय अधिवेशनादरम्यान प्रश्नोत्तराच्या तासानंतर दुपारी १२ वाजता बहुचर्चित वक्फ सुधारणा विधेयक मांडण्यात आले. या अधिवेशनात वक्फ सुधारणा विधेयक पारित करायचे असा निश्चय सरकारने केला आहे. तर, कोणत्याही परिस्थितीत हे विधेयक पारित होऊ द्यायचे नाही असा चंगच विरोधकांच्या इंडिया आघाडीने बांधला आहे. या विधेयकावर चर्चा करताना केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्टीकरण दिले आहे की, सरकारला वक्फ विधेयकात सुधारणा का करावी लागली. वक्फ सुधारणा विधेयकाला विरोधकांचा विरोध असल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांत हे विधेयक मंजूर झाले तरी वाद बाकी राहणार असल्याचे दिसत आहेत.

वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या सभागृहात मांडताना सत्ताधारी आणि विरोधक दोन्हीही आक्रमक झालेले पाहायला मिळाले. किरेन रिजिजू यांच्या मते, आता वक्फ बोर्डावर शिया, सुन्नी, बोहरा, मागासवर्गीय मुस्लीम, महिला, तज्ज्ञ गैरमुस्लीम देखील असतील. त्याचबरोबर यामध्ये चारपेक्षा जास्त गैर-मुस्लीम सदस्य असू शकतात. तसेच वक्फ बोर्डावर दोन महिला सदस्य अनिवार्य आहेत. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री यांनी म्हटले आहे की, संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ सुधारणा विधेयकावर जी चर्चा झाली आहे तशी चर्चा संसदेच्या इतिहासात आजवर कधीच झाली नाही. त्यासाठी मी संयुक्त समितीतील सदस्यांचे आभार मानतो. तसेच त्यांचे कौतुक करू इच्छितो. आतापर्यंत वेगवेगळ्या समुदायांमधील २८४ शिष्टमंडळांनी या समितीसमोर त्यांची मते मांडली. तसेच त्यांनी त्यांच्या सूचना प्रस्तुत केल्या आहेत. त्याचबरोबर २५ राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या वक्फ बोर्डांनी त्यांची मते मांडली आहेत.

किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे की, आधीच्या यूपीए सरकारने वक्फ कायद्यात बदल करून तो इतर कायद्यांपेक्षा मजबूत बनवला आहे. या कायद्याला अधिक बळ दिलं आहे. त्यामुळे कायद्यात नव्या सुधारणांची आवश्यकता होती. काँग्रेसने अनेक वर्षे वक्फ विधेयकाचा भाग नसलेल्या मुद्यांवर लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. रिजिजू यांनी पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकार कोणत्याही धार्मिक सस्थेत हस्तक्षेप करणार नाही. यूपीए सरकारने वक्फ कायदा इतर कायद्यांपेक्षा श्रेष्ठ बनवला होता. त्यामुळे यामध्ये आम्हाला सुधारणा करावी लागत आहे. सुधारणांची आवश्यकता पाहून आमच्या सरकारने हा निर्णय घेतला आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये केंद्र सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, वक्फ बोर्डाकडे सध्या संपूर्ण भारतात ९.४ लाख एकर क्षेत्रफळ असलेली जमीन आहे. त्यापैकी ८.७ लाख एकर मालमत्तेवर वक्फ बोर्डाचे थेट नियंत्रण आहे. या मालमत्तेची किंमत तब्बल १.२ लाख कोटी रुपये इतकी आहे. जगात सर्वाधिक वक्फ मालमत्ता भारतात आहेत. भारतीय लष्कर आणि रेल्वेनंतर वक्फ बोर्डाकडे सर्वाधिक जमीन आहे. संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्ण ताकदीने त्याचे समर्थन केले. ते म्हणाले, माझ्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्याने मांडलेल्या विधेयकाचे मी समर्थन करतो. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक मांडले असून, त्यावर आता चर्चा सरू आहे. या दरम्यान रिजिजू यांनी, विरोधी पक्षांकडून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप केला आहे. तर, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डने वक्फ दुरुस्ती विधेयकाला तीव्र विरोध केला आहे. याचबरोबर विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांनीही याला विरोध केला आहे.

संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बोलताना महाराष्ट्रातील दोन गावांमधील मंदिरांवर केलेल्या दाव्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, महाराष्ट्रातील वडांगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती. २०१३ मध्ये, तुष्टीकरणासाठी वक्फला एका रात्रीत अतिरेकी स्वरूप देण्यात आले. यामुळे, दिल्लीतील १२३ सरकारी मालमत्ता वक्फला देण्यात आल्या. दिल्ली वक्फ बोर्डाने उत्तर रेल्वेची जमीन वक्फच्या नावावर घोषित केली. हिमाचल प्रदेशात, वक्फ मालमत्ता म्हणून घोषित केलेल्या जमिनीवर बेकायदेशीर मशिदी बांधण्यात आल्या. तामिळनाडूमध्ये, १५०० वर्षे जुन्या मंदिराची जमीन वक्फला देण्यात आली. वक्फ हा एक अरबी शब्द आहे, ज्याचा उल्लेख काही हदीसांमध्ये आहे. वक्फ म्हणजे अल्लाहच्या नावाने मालमत्ता दान करणे आणि त्याची प्रथा इस्लामचे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात सुरू झाली. संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान बोलताना गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, वक्फशी संबंधित धार्मिक कार्यात गैर-मुस्लिमांना समाविष्ट केले जाणार नाही. परंतु, काही लोक या मुद्द्यावर गैरसमज पसरवून आपली मतपेढी सुरक्षित करण्यासाठी राजकारण करत आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, वक्फ बोर्ड आणि वक्फ कौन्सिलमधील बिगर मुस्लिम सदस्य केवळ काम योग्यरित्या होत आहे की नाही याची खात्री करण्यासाठी असतील. वक्फ सुधारणा विधेयकावर चर्चा व मंजूरी घेऊन केंद्र सरकार धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करत असल्याचा आरोप सरकारवर विरोधक करत आहेत. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर चर्चा सुरु आहे. संयुक्त संसदीय समितीमध्ये विविध मुद्दे विचारात घेऊन, कलमे विचारात घेऊन शेवटपर्यंत चर्चा झालेली नाही. अशा परिस्थितीत वक्फ सुधारणा विधेयक आणले जात आहे, तर सरकारचे त्यामागे उद्दीष्ट काय? सरकारला काय हवे ? या सरकारच्या कथनी आणि करणीत फरक आहे. हे बिल आणून या सरकारला कुणालाही न्याय द्यायचा नाही, असा आरोप अरविंद सावंत यांनी केला आहे.

हिंदुत्वावरुन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाला प्रश्न विचारला आहे की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हिंदुत्वाच्या बाजूने उभी राहणार की राहुल गांधींच्या ? त्यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी प्रत्युत्तर देत म्हटले आहे की, तुम्ही आम्हाला आता हिंदुत्व शिकवणार का? देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी काहीच केले नाही अशा लोकांच्या हाती सत्ता आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून मुस्लिम लोकही अंदमानच्या तुरुंगात राहिले आहेत. मात्र बिलात जे चूक आहे त्याला आम्ही पाठिंबा देणार नाही. बोर्डबाबत सगळे सांगत होते नोंदणी प्रक्रियेनुसार बोर्डावर सदस्य येतील. याचाच अर्थ सरकारच्या मनाप्रमाणे या बोर्डावरचे सदस्य ठरतील. वक्फ बोर्डात मुस्लिम बांधव अल्पसंख्य होतील. सत्ताधारी आणि विरोधांची अशाप्रकारे चर्चा सुरू असल्याने वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतरही अनेक वाद अनुत्तरित राहणार असल्याचे दिसते.

# जलप्रदूषणामुळे पाण्याचा स्त्रोत धोक्यात!

## वडोली निळेश्वर गावातील तलावात मासे मृत अवस्थेत

कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर गावातील तलावामध्ये मृत अवस्थेत मासे तरंगताना आढळले. तलाव हे तर जलचर प्राण्यांचे वस्तीस्थान ! परंतु तलावातच मासे मृत्यूमुखी पडल्यामुळे तेथील पाणी दूषित झाले आहे काय ? त्या पाण्यात विषारी पदार्थ कुणी मिसळले का ? असे अनेक प्रश्न तेथील गावकर्यांना पडले आहेत. गावाच्या तलावात गुरेढोरे, जलचर प्राणी असतात. जलचरांचा अधिवास याच तलावात आहे; परंतु जिथे राहतात त्यांनाच धोका असल्यास तिथे मानवी हस्तक्षेप होत आहे का, हाही प्रश्न आता निर्माण होत आहे. या तलावात मासे व इतर जलचर प्राणी होते. परंतु आता तेथील जलचरांचे राहणे धोकादायक बनले आहे. या तलावात गावातील गुरेढोरे डुंबतात, तेथील पाणी पितात. त्यामुळे गुरांना या पाण्यापासून काही धोका आहे का, असा प्रश्न येथील ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या तलावातील पाणी गावाच्या विहिरीत येते. त्यामुळे ग्रामस्थांना धोका होऊ शकतो, अशी तेथील ग्रामस्थांची भावना आहे. तलावातील पाण्याचे व मृत माश्यांचे नमुने प्रशासनाने ताब्यात घेतले आहेत आणि ते तपासणीसाठी पुढे पाठवले आहेत. ही तपासणी झाल्यानंतर काय ते समजेल. परंतु या घटनेमुळे वडोली निळेश्वरचे ग्रामस्थ चिंतेत आहेत.



वडोली निळेश्वर गावच्या तलावातील प्रदुषणाबाबत माहिती देताना राहूल पवारसह ग्रामस्थ



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

वडोली निळेश्वर गावच्या तलावातील मासे मृत अवस्थेत तरंगत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या तलावातील पाण्यामुळे जनावरांना व लोकांना विषबाधा होऊ शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे. या तलावातील मासे मृत्यूमुखी कसे पडले याचे कोडे गावकर्यांना पडले आहे. या ठिकाणी तलावातील मासे मृतावस्थेत दिसल्यामुळे तेथील ग्रामस्थ मानसिंग मदने यांनी म्हटले आहे की, दोन ते तीन दिवसांपूर्वी या ठिकाणी मृत अवस्थेत मासे सापडत आहेत. मृत माश्यांमुळे तलाव परिसरात दुर्गंधी पसरली आहे. याची माहिती आम्ही ग्रामपंचायत व वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली; त्यांनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्षात पाहणी करून तलावातील पाणी परीक्षणासाठी व तपासणीसाठी पाठवले आहे.

मसूर विभाग सरकारी आरोग्य अधिकारी डॉक्टर रूपाली कांबळे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, वडोली निळेश्वर येथील तलावातील मृत मासे व पाणी परीक्षण करून त्याचे नमुने घेऊन पाणी तपासणीसाठी पाठवले आहे. त्याचा अहवाल लवकरच येईल. यावर प्राथमिक उपयोजना म्हणून तलाव परिसर स्वच्छ करणे व मृत माशांची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायतींना सूचना दिल्या आहेत. ग्रामस्थांनी अहवाल येईपर्यंत, तलावातील पाणी जनावरांसाठी व पिण्यासाठी वापरू नये. ग्रामस्थांनी आपली व गुरांच्या आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय अधिकार्यांनी केले आहे. अहवाल आल्यानंतर त्याची सविस्तर माहिती देऊ, असे डॉ. रूपाली कांबळे यांनी सांगितले आहे.या घटनेनंतर ग्रामस्थ, वैद्यकीय अधिकारी आणि सरपंच यांनी गावच्या तलावाला भेट देऊन प्रत्यक्षात पाहणी करून प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

या तलावामध्ये हणबरवाडी - धनगरवाडी योजनेतून मध्यंतरी पाणी सोडले होते, त्यामुळे जवळजवळ ४० ते ५० टक्के पाणी शिल्लक आहे. पण उन्हाळ्यामुळे तलावाची पातळी खालवली आहे. १९७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळात वडोली निळेश्वर येथील याच तलावाने गावाला नवसंजीवनी देऊन पिण्याच्या पाण्याच्या टंचाईपासून दिलासा दिला होता, असे काही जुन्या जाणकार वृद्ध ग्रामस्थांनी म्हटले आहे. या तलावातील पाण्यावर अनेक विहिरी अवलंबून आहेत. गावची पिण्याच्या पाण्याची विहीरही याच तलावावर अवलंबून आहे. त्यामुळे पंचायत समिती प्रशासनाने यावर लवकर उपाययोजना करावी, अशी माहिती सरपंच भीमराव मदने यांनी दिली. यावेळी पत्रकार राहूल पवार, संभाजी पवार, मानसिंग मदने, अमित पवार, शहाजी मदने, धनाजी मदने, अमोल पवार, पिंटू शेवाळे, सुरेश पाटील, आरोग्य सेवक यु. एम. खेडकर, गणेश लेंडवे घटनास्थळी उपस्थित होते.

तलावातील मृत मासे पाहण्यासाठी तलाव परिसरात ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तलावातील मासे मृत्यूमुखी पडणे हे मोठ्या जलप्रदूषणाचे लक्षण असून जि. प. प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. तलावात अनेकजण स्वतः च्या वाणिज्य लाभासाठी मासे सोडतात. तलावात सोडलेल्या माशांचे संवर्धन करून या माशांची पुन्हा बाजारात विक्री केली जाते, असे समजते. परंतु या तलावातील मासे नेमके कशामुळे मृत्यूमुखी पडले, हे कोडे मृत माशांचा व पाण्याचा अहवाल आल्यानंतरच समजणार आहे. उन्हाळ्यात वडोली निळेश्वर गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असताना तलावात जलप्रदूषण होणे गंभीर आहे. त्यामुळे साठ्या तरी पिण्याच्या पाण्याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीने याबाबत अधिक जागरूक होणे काळाची गरज आहे. १९७२ साली दुष्काळात वरदान ठरलेला हा तलाव प्रदूषणाच्या उंबरठ्यावर आहे. त्यामुळे ग्रामस्थांनीच आता पाण्याच्या स्त्रोताची काळजी घेतली पाहिजे, असे वाटते.

# शिवरायांचा आठवावा प्रताप

**वाचकाचे पत्र...**

भारतात जन्मलेल्या महान नेत्यांचा विचार केला तर सर्वात प्रथम छ.शिवाजी महाराजांचे नाव लक्षात येईल ३ एप्रिल १६८० रोजी त्यांचे निधन झाले. आणि त्यांच्या मृत्यूने छत्रपतींच्या राजवटीचा अंत झाला. युद्ध कौशल्यात ते येवढे पारंगत होते की शक्तिशाली शासकही थरथर कापत असत. त्यांनीच मराठी साम्राज्याचा पाया घातला. त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण, व्यवस्थापन, आत्मविश्वास, दूरदृष्टी, योग्य सहकाऱ्यांची निवड ,शांततेने निर्णय घेणे. असे अनेक गुण त्यांचे वाखाणण्या सारखे तर होतेच!शिवाय त्यांनी मावळ्यांचा एवढा विश्वास संपादन केला होता की !आपल्या राजासाठी वाट्टेल ते दिव्य करण्यास प्रत्येक मावळा सिद्ध असायचा. महाराजांचे युद्ध नेतृत्व हे त्यांच्या सैन्याचे चैतन्य होते.महाराजांची कुलदेवी'श्री भवानी मातेवर नितांत श्रद्धा होती. ते सदैव कुलदेवीच्या अनुसंधनात असत. शिवरायांनी लढण्यासाठी खास शैली शोधून काढली होती. यालाच 'गनिमी कावा' म्हणतात. त्यांच्यातील निर्भयता,मोकळेपणा, स्त्रीदाक्षिण्य, पराक्रम, श्रद्धा, युद्धनीती, असामान्य मानस शास्त्रीय युद्धतंत्र अशा या गुणांचा समुच्चय म्हणजे शिवाजी महाराज. अशा या वीर पुरुषाच्या देशात आपण जन्मलो याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटला पाहिजे आणि आपली ही देशाप्रती काही कर्तव्य आहेत. हे स्मरणात ठेवून सदैव कृतज्ञ राहू या .

**श्रीमती वासंती लावंघरे .सातारा.**

# ईद गोड करण्यासाठी स्वतः झटणाऱ्या पोलिसांची खिदमत ए खल्क ने केली ईद गोड

**वाई/प्रतिनिधी:**

संपूर्ण सातारा शहरात रमजान ईद उत्साहात साजरी होत असताना नेहमीच मानवतेचा संदेश देणारी खिदमत ए खलक संस्थेने पुन्हा एकदा माणुसकीचे दर्शन घडवून दिलेलं आहे. कोव्हिड साथीच्या काळात सर्व नाती संपत चालली होती त्यावेळेस माणुसकीसाठी सदैव तत्परहया ब्रीदवाक्याला समोर ठेवून समाजातील सर्व घटकांसाठी जात पात विसरून कार्य केले आणि त्यासाठी त्यांचा असंख्य संघटनांनी सत्कार आणि कौतुक केले . रमजान ईद निमित्त खिदमत ए खलक च्या वतीने मशिदींबाहेर ईद हा सण शांततेत पार पडावा यासाठी कडेकोट बंदोबस्त देत असलेल्या पोलीस बांधवांना स्वतःच्या ईदचा उत्सव बाजूला ठेवत पाणी, शीरखुर्मा आणि शाकाहारी बिर्याणीचे देखील वाटप करण्यात आले . पोलीस बांधवांना केलेल्या या सहकार्याबद्दल पोलीस बांधवांनी देखील खिदमत ए खलक आणि मुस्लिम बांधवांचे आभार मानले.



ह्यावेळेस खिदमत ए खल्कच्या सादिकभाई शेख , साजिदभाई शेख, मुबिन महाडवाले यांच्या मार्गदर्शनुसार अब्दुल सुतार, हाजी सलिम भारत , हाजी अमजद भारत, असिफ खान, आरिफ खान, असिफ फरास, शाहरुख शेख, आबिद बागवान ,राजू मुस्तफा, सलिम पाळणेवाले, हाफीज मुराद, शमशुद्दीन भाई आफताब भाई , अय्याजभाई यांनी प्रयत्न केले छोटे समाजसेवक फैज मोहम्मद ,अयान ,फरान खान सुद्धा समाजसेवेचा धडा घेत सक्रिय होते.

# सह्याद्रि हॉस्पिटल्सची मिशन प्रेरणा सुरू करण्याची घोषणा

## कराडमध्ये ११८ बालकांवर मोफत शस्त्रक्रिया व उपचार; आरोग्य विभाग, रोटरी व सह्याद्रि'मुळे गोरगरीब मुलांच्या चेहऱ्यावर हसू

**कराड/प्रतिनिधी : -**

रोटरी क्लब ऑफ पुणे प्रिस्टिन, बजाज फायनान्स, आरोग्य विभाग व सह्याद्री हॉस्पिटलच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या मिशन प्रेरणा अभियानांतर्गत कराडच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये केवळ ४५ दिवसांत ११८ गोरगरीब बालकांवर मोफत शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले. यात एका साडेतीन वर्षाच्या बालकावर कराडमधील पहिलीच कॉकलीयर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्याची माहिती डॉ. अमित माने यांनी दिली.

येथील सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये मिशन प्रेरणांतर्गत करण्यात आलेल्या शस्त्रक्रीया व उपचारांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे प्रिस्टिनचे डॉ. सुधीन आपटे, उपजिल्हा रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनिता लाळे, हॉस्पिटलचे सचिन कुलकर्णी, संचालक दिलीपभाऊ चव्हाण, अमित चव्हाण, डॉक्टर, कर्मचारी, उपचार घेतलेले बालक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.





कराड : पत्रकार परिषदप्रसंगी डॉ. अमित माने, डॉ. सुनिता लाळे, सचिन कुलकर्णी, डॉ. सुधीन आपटे, दिलीपभाऊ चव्हाण व अमित चव्हाण.

डॉ. सचिन आपटे म्हणाले, रोटरीच्या माध्यमातून समाजातील अनेक विषयांवर काम करण्यात येते, मात्र शिक्षण व आरोग्यावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. संपुर्ण राज्यात मिशन मुस्कानचे काम करताना शासनाच्या आरोग्य विभागाचे चांगले सहकार्य लाभते, राष्ट्रीय बाल आरोग्य अभियानांतर्गत गावोगावी बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात येते. व त्यातील गरजू बालकांवर मोफत शस्त्रक्रिया व उपचारासाठी सुचवले जाते. त्यामुळे रोटरीच्या माध्यमातून निधी देताना खरोखर जे गरजू आहेत त्यांच्या पर्यंत मदत पोहचते. या योजनेत उपचार घेऊन बरे झालेल्या बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहिल्यानंतर आपल्याही मनाला समाधान मिळते.

सचिन कुलकर्णी म्हणाले, मिशन प्रेरणा मुळे केवळ ११८ बालके नव्हे; तर त्यांच्या ११८ कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळत आहे. उपचारांची गरज असलेल्या बालकाच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थीती नाही, अशा बालकावर या योजनेअंतर्गत मोफत उपचार मिळाल्याने त्या कुटुंबास मोठा दिलासा मिळत आहे. योग्य उपचारानंतर त्या बालकांचे आयुष्यही सुसह्य होत आहे. विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने सह्याद्री हॉस्पिटल नेहमीच समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्यासाठी तयार असते.

दिलीपभाऊ चव्हाण म्हणाले, मुळात कराडला सह्याद्रि हॉस्पिटलची उभारणीच सामाजिक उद्देशाने करण्यात आली आहे. पुणे, मुंबईच्या धर्तीवर कराड व आसपासच्या तालुक्यातील रूग्णांना कमी खर्चात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात. मोठया उपचारासाठी रूग्णांना पुणे व मुंबईला जावे लागू नये. सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये मिळत असलेल्या उपचारामुळे रूग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. मिशन प्रेरणामुळे ११८ बालकांना मिळालेल्या मोफत उपचाराने जसे त्या बालकांचे जिवन सुखकर झाले आहे. तसेच्या त्यांच्या कुटुंबियांनाही मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

# संदीप राक्षे यांनी लिहीलेल्या लेण्यांचा महाराष्ट्र या पुस्तकाचे प्रकाशन

**पुसेगाव/प्रतिनिधी:**

पुणे भोसरी येथील लेखक संदीप राक्षे यांनी लिहीलेले लेण्यांचा महाराष्ट्र या पुस्तकाचे प्रकाशन शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया व महाराष्ट्र शासन कंठ संगीत पुरस्कार प्राप्त असलेले पं कल्याणजी गायकवाड यांच्या शुभहस्ते शनिवार दि. ५ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष मसापचे अध्यक्ष राजन लाखे सर हे असणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा. स्थायी समिती सभापती नितीन लांडगे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा. स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, मा नगरसेवक विश्वनाथ लांडे, नम्रता लोंढे, कामगार नेते सचिनभैय्या लांडगे, पवना बँकेचे संचालक दादू डोळस, राजगुरुनगर सह बँकेच्या संचालक अश्विनी पाचारणे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक शरद खोपडे, गोरख शिंदे, डी ओपी मारूती तायनाथ हे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारूती कदम हे करणार आहेत, कार्यक्रमाचे आयोजन राजेश राक्षे, गौरव राक्षे, संकेत राक्षे, रितेश राक्षे यांनी केले आहे.

हा प्रकाशन सोहळा यशवंतराव चव्हाण आश्रमशाळा गुळवे वस्ती भोसरी येथे संपन्न होणार आहे. संदीप राक्षे यांची वारसा शिल्पकलेचा या पुस्तकाचे प्रकाशन लोकनेते शरदचंद्र पवार साहेब यांच्या शुभहस्ते प्रकाशन झाले आहे तसेच हेमलकसा एक रोमहर्षक सफर या पुस्तकाचे प्रकाशन महंत भास्करगिरी महाराज व आध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या शुभहस्ते प्रकाशन झाले आहे ही दोन्ही





पुस्तक वाचकांच्या विशेष पसंतीस उतरली आहेत. शरद पर्व, गुड बाय प्लॅस्टिक, संकल्पनांचा देवदूत- लक्ष्मीकांत खाबिया ही पुस्तक संपादित केलेली आहेत..

# अचलेर मध्ये अवैध धंद्यांनी मांडला उच्छाद

## बीट हवालदार यांच्या दुर्लक्षपणामुळे श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेत हातभट्टीची दारू झाली उदंड

**सोलापूर/महेश गायकवाड:**

अचलेर मध्ये अवैध धंद्यांनी सद्या मोठ्या प्रमाणात उच्छाद मांडला आहे. अचलेर बीट चे हवालदार यांच्या दुर्लक्षपणामुळे अचलेर व परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध धंद्यांनी उच्छाद मांडला आहे श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेत हातभट्टीची दारू उदंड झाल्यामुळे देवाच्या पालखी मिरवणुकीत दारुड्यानी गोंधळ घातला तर चोरांनी आपले हात ओले करून घेतले. केवळ तीन होमगार्ड यात्रेत बंदोबस्ताला होते वाघमारे मात्र यात्रेत गायब झाले होते.

अचलेर मध्ये यात्रा काळात हातभट्टीची दारू अड्डे बंद करण्यात यावेत तसेच अवैध धंदे बंद करण्यात यावेत अशी मागणी करूनही या कडे पोलिस खात्याने दुर्लक्ष केल्यामुळे यात्रेत हातभट्टीच्या दारूचा मोठ्या प्रमाणावर सुकाळ झाला आणि हातभट्टीची दारू विक्री करणारे आणि हातभट्टी अड्डे चालविणाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर फावले. यास केवळ पोलिस खात्याचे दुर्लक्ष करणभीत असल्याचे कळते.

अचलेर चे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेस पाच दिवस अवैध धंद्यांना आळा घालण्यात यावे आणि हातभट्टीची दारू अड्डे बंद ठेवण्यात यावे अशी मागणी अचलेर चे बीट हवालदार वाघमारे यांच्याकडे करण्यात आली होती परंतु त्यांनी या मागणी कडे दुर्लक्ष केले आणि त्यामुळेच अचलेर येथे यात्रा काळात आणि दररोजच हातभट्टीची दारू अड्डे सुरू असुन अवैध धंद्यांनी उच्छाद मांडला आहे

एस टी स्टँड परिसरात तसेच शाळा परिसरात आणि भीमनगर मध्ये हे हातभट्टीची दारू अड्डे असून गावात सर्वत्र इतर अवैध धंद्यांनी उच्चांक गाठला आहे. गावात सर्वत्र गुटखा राजरोस पाने विक्री केला जात असून हा गुटखा कोण विक्री करतो हातभट्टीची दारू अड्डे कुणाचे आहेत अवैध धंदे कोण करत आहेत हे सर्व पोलिस यंत्रणेला माहिती असून ही त्याकडे पध्दतशीर आणि अर्थपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे .

अचलेर गावात सध्या हातभट्टी दारूचा महापूर आला असून याकडे पोलिस यंत्रणेचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे त्यामुळे गावात तळीरामांची मोठ्या प्रमाणात संख्या वाढली आहे यात्रेत तळीरामानी मोठ्या प्रमाणावर धिंगाणा घातला ही बाब लज्जास्पद ठरली आहे कावड आणि नंदिकोल घेऊन नाचणाऱ्या सेवेकरी भक्तांच्या मध्ये येऊन त्यांना अडथळा करण्याचे काम मोठ्या प्रमाणात तळीरामानी केले त्यामुळे श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेस गालबोट लागले हे गालबोट केवळ गावात सुरु असलेल्या हातभट्टी दारूच्या अड्ड्यामुळे आणि अवैध धंद्यांमुळे लागले आहे.



### अचलेर बीट चे हवालदार यांची मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करणार: संजय रणदिवे

अचलेर मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू आहेत. त्यांनी या अवैध धंद्यांकडे वेळोवेळी दुर्लक्ष केले आहे त्यामुळे त्यांची तक्रार आपण मुख्यमंत्री यांच्याकडे देणार आहे अशी माहिती भीमशक्ति सामाजिक संघटनेने राज्य सचिव संजय रणदिवे यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना दिली.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# ‘फुले’ चित्रपटातील ब्राह्मण समाजाच्या भावना दुखावणारे दृश्य वगळावे

## ब्राह्मण संघटनेची मागणी; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर

**कराड/प्रतिनिधी : -**
नुकत्याच प्रदर्शित होणाऱ्या 'फुले' या चित्रपटात ब्राह्मण समाजाच्या भावना दुखावतील असे दृश्य दाखवण्यात आले आहे. परंतु, महान लोकांच्या आडून आमच्या अस्मितांवर घाव घालू नका. लहान मुलाच्या हातून शेण मारण्याचे दृश्य हा चित्रपट प्रदर्शित होण्यापुर्वी चित्रपटातून वगळावे. यामुळे जे घडेल त्यांची संपूर्ण जबाबदारी चित्रपट निर्मात्यांना घ्यावी लागेल. त्यामुळे ताबडतोब फुलेंच्या चित्रपटातून हे दृश्य वगळण्यात यावेत, अशी विनंती ब्राह्मण संघटनांच्या वतीने करण्यात आली.

बुधवारी याबाबतचे निवेदन प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी केलेले कार्य, स्त्री शिक्षणासाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी दिलेला लढा महान आहे. आज आपल्या देशातील ज्या मुली त्यांच्यामुळे शिक्षण घेत आहे, नवनवीन क्षितिजे पादाक्रांत करत आहेत, याचं निर्विवाद श्रेय फुले दाम्पत्याला जातं. अशा महान व्यक्तींवर कलाकृती सादर करताना त्यांनी सांगितलेल्या काही बाबींचा देखील विचार केला गेला पाहिजे. त्यावेळी महात्मा फुले यांनी भविष्यात सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठी जातीच्या नावावर लोकांना लढवलं जाईल, हेही सांगितले होते. ही बाब लक्षात घेतली, तर फुले दाम्पत्याच्या जीवनावर आधारित 'फुले' या येऊ घातलेल्या चित्रपटात काही आक्षेपार्ह आणि ब्राह्मण समाजाच्या



अस्मिता दुखावणाऱ्या गोष्टी आहेत. त्या टाळता आल्या असत्या.

आमची दिग्दर्शकांना विनंती आहे की, महान लोकांच्या आडून आमच्या अस्मितांवर घाव घालू नका. तेवढे लहान मुलाच्या हातून शेण मारण्याचे दृश्य चित्रपट प्रदर्शित होण्यापुर्वी चित्रपटातून वगळावे. सदर दृश्याबाबत निर्माता, लेखक, संवाद लेखक, पटकथा लेखक, संपादक व दिग्दर्शक या सर्वांनी सविस्तर खुलासा करताना समस्त ब्राह्मण समाजाचे प्रतिनिधी, सांस्कृतिक मंत्री, सेन्सॉर बोर्ड सदस्य, यांच्यासमोर सदर चित्रपट 'फुले'चा खास शो ठेवून समाधानकारक खुलासेवार चर्चा व्हावी, अशीही विनंती यांनी उद्यानाद्वारे करण्यात आली आहे.

### शिवीगाळ, दमदाटी प्रकरणी परस्पर विरोधी तक्रारी

**सातारा/प्रतिनिधी:**
शिवीगाळ, दमदाटी प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. एक रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास पिरवाडी, सातारा येथे रोहित मोहन शिंदे रा. पिरवाडी, सातारा यांना जुन्या वादाच्या रागातून शिवीगाळ, दमदाटी केल्याप्रकरणी आफताब असिफ शेख, निहाल युसुफ शेख आणि मोहम्मद नूरसाब कालदगी सर्व रा. पिरवाडी, सातारा यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान आफताब असिफ शेख यांनी दिलेल्या तक्रारीत रोहित मोहन शिंदे यांनी त्यांना शिवीगाळ दमदाटी करून हाताने मारहाण केल्याचे म्हटले आहे. दोन्ही गुन्ह्यांचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गवळी करीत आहेत.

# पांचगणी सायबर पोलिसांनी मिळवून दिली ऑनलाईन फसवणुकीची रक्कम

**पांचगणी/प्रतिनिधी:**
पांचगणी पोलीस ठाणे सायबर व गुन्हेप्रकटीकरण शाखेने सायबर लुटारुंच्या फसवणुकीचे बळी ठरलेल्या चार जणांना त्यांच्या फसवणुकीची रक्कम परत मिळवून दिली आहे. याबाबत पांचगणी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पांचगणी पोलीस ठाणे हद्दीतील रहीवासी व पर्यटकांचे ऑनलाईनद्वारे अमिष दाखवुन फसवणुक होणेचे प्रमाण वाढलेले होते. त्या अनुषंगाने सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख , अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती वैशाली कडुकर व वाई उपविभागिय पोलीस अधिकारी बाळासाहेब भालचीम या वरीष्ठांचे आदेशाने ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम शोध घेणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. या आदेशान्वये सायबर तसेच गुन्हे प्रकटीकरण पथक पोलीस अंमलदार यांनी पांचगणी पोलीस ठाण्यात ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कमेचा तपास हाती घेतला होता.

पांचगणी पोलीस ठाणेत दाखल झालेल्या ऑनलाईन फसवणुक झालेल्या चार अर्जांची बुद्धी कौशल्याने व तांत्रिक माहीतीच्या आधारे पोलीस ठाणे हद्दीतील परीसर व आजुबाजुचे पोलीस ठाणे हद्दीतुन तसेच इतर जिल्ह्यातून शोध घेवुन एकुण ३,७०,०००/- रुपये मिळवण्यात या पथकाला यश आले. ऑनलाईन फसवणुक झालेली रकमेचा शोध घेवुन ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम प्राप्त करण्यास सायबर तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकास यश प्राप्त झाले असुन नमुद ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम नागरीकांना परत करणेत आली आहे.

पांचगणी पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांचे मार्गदर्शनाखाली सायबर तसेच गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस अंमलदार पोलीस नाईक तानाजी शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल उमेश लोखंडे व पोलीस कॉन्स्टेबल अमोल धर्मु जगताप यांनी या शोध मोहिमेत सहभाग घेतला.

# विटा नगरपालिका कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सुजित पाटील तर व्हा.चेअरमनपदी अनिल पवार

**विटा/प्रतिनिधी:**
खानापूर तालुक्यातील विटा नगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित विटा या पतसंस्थेचे चेअरमन म्हणून सुजित सुखदेव पाटील यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. तर व्हाईस चेअरमनपदी अनिल निवृत्ती पवार यांची निवड झाली.

यावेळी निवड निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यु .एस. माधळे यांनी काम पाहिले. या संस्थेच्या संचालक मंडळाची सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीसाठी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था( समितीच्या निवडणुका) नियम २०१४ चे नियम ३२ नुसार नमुना ई मध्ये (यथोचितरित्या निवडून आलेले) निवडणूकीचा निकाल या कार्यालयात वाचला तसेच क्र.३ अन्वये सादर केला. त्या अर्थी मी खानापूर तालुक्याचे सहकारी



संस्था सहायक निबंधक विलास कोळेकर यांनी निकाल जाहीर केला.

या निवडीमध्ये सुजित सुखदेव पाटील ( चेअरमन) तर व्हा. चेअरमन म्हणून अनिल पवारसह या संस्थेच्या संचालक मंडळावर संदीप विष्णू वाघमारे, सुरेश शहाजी भोसले, रघुनाथ गंगाराम कदम, विजय अप्पा भिंगारदेवे, मयुरी ज्ञानदेव कांबळे, रेश्मा प्रकाश कांबळे, मधुकर रामचंद्र गाडीलोहार, अतुल दिलीप कांबळे तर एक रिक्त पद ठेवण्यात आले. या सर्वांची एकमताने निवड करण्यात आली.

निवडी नंतर चेअरमन, व्हा. चेअरमन यांचा पुष्पगुच्छ गुच्छ देऊन अधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी विटा नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांचा चेअरमन सुजित पाटील सह व्हा. चेअरमन अनिल पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तर मुख्याधिकारी यांनी चेअरमन, व्हा. चेअरमनसह संचालकांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# महाडिक मल्टिस्टेट संस्थेला १.८३ कोटीचा ढोबळ नफा

**इस्लामपूर : प्रतिनीधी:**
वनश्री नानासाहेब महाडीक मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीस या आर्थिक वर्षात १ कोटी ८३ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक व जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडीक यांनी दिली.

राहुल महाडीक म्हणाले, ग्राहकांचा विश्वास व पारदर्शक कारभारामुळेच संस्थेचा राष्ट्रीय पातळीवर गौरव केला आहे. संस्थेचे एकूण भाग भांडवल १२.५८ कोटी एवढे असून ठेवी १६०.१० कोटी आहेत. संस्थेची बँकातील गुंतवणूक ५४.३२ कोटी, कर्जे ११८.६४ कोटी असून संस्थेची एकूण स्वमालकीची जागा १२.१३ कोटी एवढी आहे. संस्थेची वसुली शंभर टक्के असून एनपीए शून्य टक्के आहे. संस्थेच्या एकूण २० शाखा यशस्वीरीत्या कार्यरत आहेत. संस्थेला आदर्श सहकारी संस्थेसह विविध राष्ट्रीय





पुरस्कारांनी सन्मानित केले असून संस्था सामाजिक उपक्रमांत आघाडीवर असते. ठेवीदार व ग्राहक यांच्या विश्वासास पात्र राहून राज्यातील एक आदर्श संस्था म्हणून विशेष ओळख निर्माण केली आहे.

चेअरमन सतीश महाडीक म्हणाले, स्व. वनश्री नानासाहेब महाडिक यांच्या नावे सुरू केलेल्या संस्थेची संस्थापक राहुल महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल यशस्वीरीत्या सुरू आहे. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.प्रदीप पाटील, संचालक कपिल ओसवाल, रवींद्र आडमुठे, सचिन पाटील, सचिन सातपुते, सागर कोरुचे, अशोक पाटील, सुनील सोनवणे, अर्चना खटावकर, शैलजा कागले तसेच सर्व शाखांचे शाखाधिकारी उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप पाटील यांनी स्वागत केले. व्यवस्थापक आर.एम. बागडी यांनी आभार मानले.

# शहर भाजप मधील अंतर्गत खदखद चव्हाट्यावर

## निष्ठावंतांना विश्वासात घेतले जात नसल्याची माजी नगरसेवक विजय काटवटे यांची तक्रार

**सातारा/प्रतिनिधी:**
सातारा शहराध्यक्ष पदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू असताना भाजप शहर कार्यकारणी मधील अंतर्गत खदखद चव्हाट्यावर आली आहे .२५ वर्ष भारतीय जनता पार्टीच्या बांधणीसाठी सक्रिय असणाऱ्या जुन्या निष्ठावंतांना काहीजण विश्वासात घेत नसल्याची तक्रार भाजपचे सक्रिय सदस्य अयोध्या फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी नगरसेवकविजय काटवटे यांनी केली आहे काही जणांच्या कार्यपद्धतीमुळे पक्ष उगाच बदनाम होत असल्याची तक्रार त्यांनी केली.

सातारा शहरासह इतर विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीने नव्या दमाचे शहराध्यक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून निवडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे .यामध्ये बूथ प्रमुख मंडल प्रमुख तसेच भारतीय जनता पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते यांचा अहवाल घेऊन त्याबाबतचे सविस्तर मांडणी जिल्हा कार्यकारणीच्या माध्यमातून प्रदेश कार्यकारणीला केली जाणार आहे .मात्र सातारा शहरात सारे काही ऑलवेल नसल्याचे दिसून आले. शहराध्यक्ष पदासाठी वय वर्ष ३० ते ४५ वयोगटाचा निकष ठेवून त्या अंतर्गत केवळ पक्षाच्या वीस जणांच्या प्रतिक्रिया मागवण्यात आल्या आहेत यावर भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक विजय काटवटे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला.

ते म्हणाले ज्यांनी २५ वर्षे पक्षाच्या बांधणीसाठी तळमळीने कार्य केले त्यांना का डावलले जात आहे ? भारतीय जनता पार्टीने प्रत्येकाला जबाबदारी नेमून दिलेली आहे मात्र संघटना बांधणीमध्ये ज्यांचे सक्रिय योगदान आहे त्यांची मते डावलली जात आहेत शहराध्यक्ष पदासाठी ३० ते ४५ वयोगटाचा निकष असून त्यासाठी केवळ २० सक्रिय सदस्यांच्या प्रतिक्रियांचा अहवाल जिल्हा कार्यकारणीकडे पाठवला जाणार आहे यावर तीव्र आक्षेप नोंदवत काटवटे यांनी काही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांना न पटणारी उत्तरे देण्यात आल्याचा आरोप काटवटे यांनी केला .ज्यांनी पक्षबांधणीत सक्रीय योगदान दिले त्यांना जर डावलले जात असेल तर उपयोग काय आमच्या योगदानाचा पक्षाने जरूर विचार करावा शहराध्यक्ष पदाच्या निवडीमध्ये फक्त २० लोकांच्याच प्रतिक्रिया का आणि त्या निकषांमध्ये आम्ही का बसत नाही याचा तातडीने त्यांनी खुलासा करण्याची मागणी केली. काटवटे यांच्या या आरोपामुळे भाजप शहर कार्यकारणीच्या निवड प्रक्रियेत वादावादी समोर आली आहे काही ठराविक कार्यकर्ते पुढारपणा करत असल्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या अडचणी होतात असा खाजगी मध्ये सूर काहीजणांनी अळवला आहे.

# नाथाजी मोहिते यांचे निधन

**तांबवे/प्रतिनिधी:**
वसंतगड ता कराड येथील रहिवाशी नाथाजी बापू मोहीते सर यांचे वयाच्या ८१व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.ते विठ्ठल गणोजी माने हायस्कूल चे सेवावृत्ती शिक्षक होते.



ते सह्याद्री साखर कारखाना ऊस तोडणी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम केले आहे गावातील सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात काम करत होते. पुणे परिवहन महामंडळ चे सहाय्यक अभियंता अजित मोहिते यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा दोन मुली सुना नातवंडे,जावई असा परिवार आहे. रक्षा विसर्जन विधी गुरूवार दि ३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ वाजता वसंतगड येथील स्मशानभूमीत होणार आहे.

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर इस्लामपूर पालिकेने खबरदारी घ्यावी

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना निवेदन

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**
शहरात पावसाच्या पाण्याने गटारी तुंबून पाणी रस्त्यावर येत आहे. तसेच शहरातील रस्त्यावर खड्डे पडून नागरिकांना वाहतुकीस अडथळा येत आहे. शहरातील रस्त्याकडेच्या बऱ्याच खांबावरील दिवे बंद असून त्या परिसरात अंधार पडत आहे. आपण स्वतः या प्रश्नांमध्ये लक्ष घालून हे प्रश्न सोडवावेत, असे निवेदन इस्लामपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक पृथ्वीराज पाटील यांना देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, माजी उपनगराध्यक्ष शंकरराव चव्हाण यांनी हे निवेदन दिले. यावेळी नगरपालिकेचे नूतन मुख्याधिकारी तथा प्रशासक पृथ्वीराज पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागतही करण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, पावसाळा व पावसाच्या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने काही काळजी घ्यायला हवी. मंगळवार (दि. १) रोजी शहरात पाऊस होऊन शहरातील धोंडीराम महाराज मंदिरासह शहरातील बऱ्याच भागात पाणी साचून नागरिकांना ये-जा करण्यास अडचण निर्माण झाली होती. आता पाडव्यानंतर कमी-जास्त प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे शहरातील गटारी जेसीबीने स्वच्छ करायला हव्यात. यामध्ये नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने तातडीने लक्ष घालण्याच्या सूचना आपणाकडून व्हाव्यात. शहरातील रस्त्या वरील खड्डे मुजवून वाहतुकीस अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच शहरातील



इस्लामपूर : मुख्याधिकारी तथा प्रशासक पृथ्वीराज पाटील यांना निवेदन देताना शहराध्यक्ष शहाजी पाटील, समवेत शंकरराव चव्हाण, सचिन कोळी, दिग्विजय पाटील व मान्यवर.

रस्त्याच्या बाजूच्या खांबावरील बंद दिवे सुरू करण्यासाठी संबंधित विभागास कडक सूचना कराव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, माजी अध्यक्ष सचिन कोळी, अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष शकील जमादार, पै. गंगाराम शिंगाडे, अंकुश जाधव, मिलिंद पाटील उपस्थित होते.

# बदलाच्या दृष्टीने ‘सह्याद्रि’च्या सभासदांची वाटचाल

पान १ वरुन
सह्याद्रि हा महाराष्ट्रात नावाजलेला कारखाना. पण तुमच्यावरच कारखाना वाचवायला पाहिजे असं, म्हणण्याची वेळ आली. कारखाना अडचणीत आणला कोणी? तुम्ही अमर्याद सत्ता वापरून स्वतःचे घर भरलं, कामगारांचा वैयक्तिक कामासाठी गैरवापर केला. कारखान्यात फार मोठा भ्रष्टाचार झाला असून विद्यमान चेअरमनांनी ४० वर्षांत ७० ते ८० कोटी स्वतःच्या कुटुंबावर उडवले असल्याचा आरोप आ. घोरपड यांनी यावेळी केला.

ऊस जाण्याच्या बाबतीत एकही शेतकरी, सभासद समाधानी नाही. फक्त चेअरमन व त्यांचे कुटुंब समाधानी आहे. सगळ्यांची लूट करून राजकारणात पैसा वापरला. विधानसभा निवडणुकीत जनतेने यांना दाखवून दिले आता कारखान्यात बदल करायचाय असे प्रत्येक सभासदाची म्हणणे आहे. पाणी संस्थेच्या माध्यमातून सभासदांवर दबाव टाकला जातो अधिकार त्यांना दिला कोणी. इरिगेशन योजनांसाठी तुमचे योगदान काय दरवर्षी इन्स्पेक्शनच्या नावाखाली दोन लाख रुपये फी घेऊन जाता. मात्र ४०-५० वर्षात इरिगेशन संस्थांमध्ये नवीन टेक्नॉलॉजी बाबत सकारात्मक विचार का केला नाही. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्हा नियोजन मधून १६ तासांची लाईट योजनांना दिली मात्र यांच्याकडे लोक गेले असता यांनी ७०-८० लाख रुपये घेऊन या असे सांगितले. पण येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना २४ तास लाईट देता येईल असे नियोजन करू असे आमदार घोरपडे म्हणाले. कारखान्याच्या सर्व पाणीपुरवठा योजनांना ऊर्जेत अवस्था येण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. यासेच कारखान्यात सत्तांतर झाल्यावर ए टू झेड टंग्याचा बंदोबस्त केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सह्याद्रि कारखान्याचे माजी संचालक रमेश मोहिते, ॲड. शशिकांत मोहिते, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन अनिल मोहिते, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले.

# शारदा बर्गे यांचे निधन

**कराड/प्रतिनिधी : -**
सिटी न्युज चॅनेलचे मुख्य संपादक आणि सिटी साऊंड स्टुडिओचे संचालक माणिक बर्गे यांच्या मातोश्री कै. शारदा सर्जेराव बर्गे (वय ७६) यांचे आजाराने निधन झाले. विद्यानगर - सैदापूर येथील श्री. नवजीवन सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्या त्या आधारवड होत्या. रक्षा विसर्जन गुरुवार (दि. ३) एप्रिल रोजी सकाळी साडे नऊ वाजता वैकुंठ स्मशानभूमी, मंगळवार पेठ, कराड येथे होणार आहे.



# कोळी महासंघाच्या पदाचा देवेंद्र कोळी यांनी दिला राजीनामा

**अक्कलकोट/प्रतिनिधी :-**
अक्कलकोट तालुका कोळी महासंघाच्या युवक आघाडीच्या अध्यक्ष पदाचा देवेंद्र कोळी यांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यांनी अचानक का राजीनामा दिला? याचे कारण गुलदस्त्यात आहे.

अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील अक्कलकोट तालुका कोळी महासंघाच्या युवक आघाडीचे अध्यक्ष असलेले देवेंद्र कोळी यांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. श्री. कोळी यांनी तीन



वर्षांपासून समाजामध्ये विविध उपक्रम राबवून समाजामध्ये चांगली प्रतिष्ठा जपली आहे. यापूर्वी कोळी महासंघ विद्यार्थी संघटनेचे पदही त्यांच्याकडेच होते. त्यांच्या चांगल्या कामाच्या आणि संघटना वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना तालुका युवा अध्यक्षपद मिळाले होते. त्यांनी संघटनेत अनेक कामे केली आहेत.

दरम्यान, देवेंद्र कोळी यांचा वैयक्तिक अडचणी करता पदाची राजीनामा पश्चिम महाराष्ट्र कोळी महासंघ अध्यक्ष अरुण लोणारी यांच्याकडे लेखी स्वरूपात पाठवला आहे. त्यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

### लोकशाही दिनाचे ७ एप्रिलला आयोजन

**सातारा/प्रतिनिधी:**
माहे एप्रिल २०२५ मध्ये होणारा लोकशाही दिन हा सोमवार दि. ७ एप्रिल रोजी कॉन्फरन्सहॉल, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे दुपारी १.०० वा. आयोजित केल्याची माहिती प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी मनोहर गव्हाड यांनी दिली.

# ‘आहेर अभियांत्रिकी’मध्ये स्पेक्ट्रम २०२५ स्पर्धा उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : -**
येथील डॉ. दौलतराव आहेर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शुक्रवार (दि. २८) मार्च रोजी स्पेक्ट्रम २०२५ ही प्रोजेक्ट, तसेच कोड वार, कॅड मास्टर प्रोटोटाईप मॉडेलिंग क्वीझ पोस्टर यांसारख्या विविध तांत्रिक स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये विविध अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सुमारे ७०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

या सर्व स्पर्धांचा मुख्य उद्देश सांगताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अन्वर मुल्ला म्हणाले, हे प्रदर्शन भरवून सर्व स्पर्धकांना योग्य पद्धतीने गुणांकन करू विजेत्यांना रोख रक्कम बक्षीस आणि सर्वांना प्रोत्साहन देणे, हा यामागचा उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कराड विभागाचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब मोहिते होते.



विद्यार्थांना मार्गदर्शन करताना बाळासाहेब मोहिते म्हणाले, विद्यार्थांनी प्रकल्प तयार करताना त्याचा सामान्य माणसांचे जीवन अधिक सुखकारक कसे होईल, यावर भर द्यावा. विजेचा वापर करताना जेवढी गरज असेल, तेवढीच वापरली पाहिजे. अन्यथा भविष्यात आपणाला मोठ्या प्रमाणावर प्रदुषणास सामोरे जावे लागेल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुजर यांनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थांनी देश महासत्ता होण्याच्या दृष्टीने अत्याधुनिक तत्रंज्ञानाचा वापर करून निर्माण होणारे प्रकल्प समाजातील तळागाळातील लोकांना कसे उपयुक्त होतील, या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजदीप यादव व प्रा. पवन लोकरे, सुत्रसंचालन प्रा. अर्चना मुळीक व प्रा. शिफा शिकलगार, स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष इंद्रजीत गुजर व सचिव डॉ. माधुरी गुजर यांच्या यांनी केले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. एच. एम. कुंभार, डॉ. व्ही. एम. जमादार, सर्व विभागप्रमुख शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

## नशिबाची परीक्षा

गुरुवार ३ एप्रिल २०२५

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल १-२-६ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 146<br>470<br>344 | 1-8 | 170<br>189<br>116 | 80-15-24-69-78 |

### कल्याणम

उदय-अस्त सिंगल ६-४-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 123<br>240<br>330 | 6-2 | 156<br>129<br>110 | 41-60-92-75-28 |

### मुंबैम (मेन )

उदय-अस्त सिंगल ३-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 120<br>346<br>337 | 3-0 | 190<br>280<br>244 | 31-60-57-89-02 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# आज का अंदाज

गुरुवार दिनांक ३ एप्रिल २०२५

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| ‘पत्थर फोड एकच’ | ‘पत्थर फोड एकच’ |
| १ - ४ - ५ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| ५८८-१६७-१६८-१७० | ३९०-३६६-१५०-४५८ |
| १५५-२२०-३४८-३६९ | २२८-४४७-२६८-१८८ |
| २९०-३५६-२३०-२६० | ११०-२४९-७९०-२६९ |
| जोडी | जोडी |
| १३ - ४ - ५६ - ८२ | २४ - ५४ - ६८ - ७८ |
| १० - ४० - ५९ - ८६ | २० - ५० - ६३ - ७३ |
| १७ - ४७ - ५२ - ८९ | २१ - ५१ - ६९ - ७९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ०३-०४ एप्रिल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

गुरुवार दिनांक ३ एप्रिल २०२५

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | २१ | ३१ | ६० | ९० |
| | २४ | ३४ | ६८ | ९८ |
| | २७ | ३७ | ६६ | ९४ |
| | १२९ | ७७९ | १५० | २३४ |
| | २४६ | ३३७ | ३५८ | ४५० |
| | ५८९ | ५८० | २६८ | १४४ |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

